# ऑस्ट्रेलियाची २१८ धावांची आघाडी

## केरी व स्टार्कची अर्धशतकी भागीदारी | एनगिडी व रबाडाने ३-३ बळी घेतले

**लंडन, दि. १३ :**

लंडनमध्ये दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) चा अंतिम सामना खेळला जात आहे. सामन्याचा तिसरा दिवस शुक्रवारी दुपारी ३ वाजता सुरू होईल. ऑस्ट्रेलियाने २१८ धावांची आघाडी घेतली आहे. दुसऱ्या डावात ८ विकेट गमावून संघाकडे १४४ धावा आहेत.


ॲलेक्स क्ररी आणि मिशेल स्टार्क यांनी आठव्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. कॅरी ४३ धावा काढून बाद झाला. स्टार्क आज नॅथन लायनसोबत संघाचा डाव पुढे नेईल. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात २१२ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेने १३८ धावा केल्या. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाला ७४ धावांची आघाडी मिळाली.



गुरुवारी, सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात फक्त १३८ धावा केल्या. डेव्हिड बेडिंगहॅमने ४५ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने ६ बळी घेतले. ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या दिवशी दुसऱ्या डावाला सुरुवात केली. संघाने ७३ धावांवर ७ विकेट गमावल्या. येथून ॲलेक्स केरी आणि मिशेल स्टार्क यांनी भागीदारी करून संघाला १४४ धावांपर्यंत पोहोचवले. संघाकडे अजून २ विकेट शिल्लक आहेत.

**पहिल्या दिवशी १४ विकेट्स पडल्या**

बुधवारी लॉर्ड्स स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने २१२ धावांत १० विकेट गमावल्या. ब्यू वेबस्टरने ७२ आणि स्टीव्ह स्मिथने ६६ धावा केल्या. कागिसो रबाडाने ५ विकेट घेतल्या. दक्षिण आफ्रिकेनेही आपला डाव सुरू केला, पण फक्त ४३ धावांत ४ विकेट गमावल्या.







# काणकोण बुद्धिबळ असोसिएशन्सच्या अध्यक्षपदी रामदास सावंत



रामदास सावंत



किरण ना. गावकर



विजू ना. गावकर



दीपाली अग्रासानी



सुधाकर पटगर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**आगोंद, ता.१३(प्रतिनिधी) :** काणकोण तालुका बुद्धिबळ असोसिएशन्सच्या (सीटीसीएच्या) नोंदणीकृत कार्यालयात २०२५ ते २०२९ या चार वर्षांच्या कालावधीसाठी,दि.२ जुन रोजी, झालेल्या असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत श्री रामदास बाळकृष्ण सावंत यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

असोसिएशनच्या कार्यकारी समितीचे इतर सदस्य पुढीलप्रमाणे आहेत:–

उपाध्यक्ष – किरण नाईक गावकर, सचिव – भिकारो उर्फ विजू नाईक गावकर, सहसचिव – सुधाकर पटगर, कोषाध्यक्ष – ॲड. दीपाली अग्रासानी, कार्यकारी सदस्य, वल्लभ देसाई, सौरभ कामत, सुश्री माया नाईक, सुश्री संतिषा पागी या आहेत.

गोवा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष महेश कांदोळकर यांनी काणकोण तालुका बुद्धिबळ संघटनेच्या नवनिर्वाचित कार्यकारी समितीचे यानिमित्त अभिनंदन केले आहे.

निवडणुकी दरम्यान गोवा बुद्धिबळ संघटनेने आंतरराष्ट्रीय मध्यस्थ श्री. अरविंद म्हामल यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली. यावेळी तिसवाडी तालुका असोसिएशनचे सचिव आणि जीसीए सदस्य श्री. दत्ताराम पिंगे हे देखील उपस्थित होते.

सीटीसीएचे निवृत्त अध्यक्ष श्री. शैरेंद्र नाईक यांनी सदस्यांचे स्वागत केले आणि सीटीसीएने स्थापनेपासून केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी काणकोणमध्ये बुद्धिबळ विकसित करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांचे आणि इतर सदस्यांचे आभार मानले. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अध्यक्षीय अधिकारी श्री. वासल कार्व्हालो यानी मेहनत घेतली.

# स्टीव्ह स्मिथचा ऐतिहासिक विक्रम

- लॉर्ड्सवर सर्वाधिक धावा करणारा परदेशी फलंदाज
- इंग्लंडमध्ये ठोकले १८ वे अर्धशतक

**लंडन, दि. १३ :**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात लंडनमधील लॉर्ड्स स्टेडियमवर खेळला जात आहे. बुधवारी सामन्याच्या पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा संघ २१२ धावांवर ऑलआउट झाला. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ३ विकेट गमावल्यानंतर ४० धावा केल्या.

ऑस्ट्रेलियाच्या स्टीव्ह स्मिथने ६६ धावा केल्या, यासह तो इंग्लंडमध्ये ५० पेक्षा जास्त धावा करणारा सर्वाधिक परदेशी फलंदाज बनला. तो लॉर्ड्स स्टेडियमवर सर्वाधिक धावा करणारा परदेशी खेळाडूही बनला. ऑस्ट्रेलियाने शेवटच्या ५ विकेट फक्त २२ धावांत गमावल्या.

ऑस्ट्रेलियाचा नंबर–४ फलंदाज स्टीव्ह स्मिथ ६६ धावा काढून बाद झाला. त्याने इंग्लंडमध्ये त्याचे १० वे अर्धशतक झळकावले, त्याने येथे ८ शतकेही झळकावली आहेत. थढउ फायनलमध्ये अर्धशतक झळकावून स्मिथ इंग्लंडमध्ये सर्वाधिक १८ अर्धशतक झळकावणारा परदेशी फलंदाज बनला. त्याने ऑस्ट्रेलियाचा ॲलन बॉर्डर आणि वेस्ट इंडिजचा विवियन रिचर्ड्स यांचा विक्रम मोडला. दोघांचाही इंग्लंडमध्ये १७–१७ अर्धशतक झळकावण्याचा विक्रम आहे.

लंडनमधील लॉर्ड्स स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात



ऑस्ट्रेलियाचा स्टीव्ह स्मिथ परदेशी फलंदाजांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याच्याकडे आता ६ सामन्यांच्या १० डावात ५९१ धावा आहेत. यामध्ये त्याने २ शतके आणि ३ अर्धशतके केली आहेत. स्मिथने ऑस्ट्रेलियाच्या वॉरेन बार्डस्लीचा ५ सामन्यात ५७५ धावा करणारा विक्रम मोडला.

दक्षिण आफ्रिकेचा यष्टिरक्षक काइल व्हेरियनने एका हाताने डायव्हिंगचा शानदार झेल घेतला. २४ व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मार्को जॅन्सनने लेग स्टंपकडे चेंडू टाकला. ट्रॅव्हिस हेड फ्लिक करण्यासाठी गेला, पण चेंडू त्याच्या बॅटला लागला आणि तो विकेटकीपरकडे गेला. येथे व्हेरियनने त्याच्या उजवीकडे डायव्ह केला आणि एका हाताने एक शानदार झेल घेतला. ११ धावांवर हेडला पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले.

काइल व्हेरियनने उजवीकडे डायव्ह मारला आणि एका हाताने एक सुंदर झेल घेतला.


काइल व्हेरियनने उजवीकडे डायव्ह मारला आणि एका हाताने एक सुंदर झेल घेतला.

४. रिव्ह्यू न घेतल्यामुळे वेबस्टर नाबाद राहिला.

२९ व्या षटकात, दक्षिण आफ्रिकेने रिव्ह्यू घेतला नाही म्हणून ऑस्ट्रेलियाचा ब्यू वेबस्टर बाद होण्यापासून वाचला. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर, कागिसो रबाडाने चांगल्या लांबीवर इनस्विंगर टाकला. चेंडू वेबस्टरच्या पॅडवर लागला, रबाडाने एलबीडब्ल्यूसाठी अपील केले, परंतु पंचांनी नॉट आउटचा संकेत दिला.

रबाडाने रिव्ह्यू घेण्याचा सल्ला दिला, पण कर्णधार टेम्बा बावुमाने नकार दिला. त्याने चेंडू बॅटला लागल्याचे संकेत दिले. रिप्लेमध्ये असे दिसून आले की जर डीआरएस घेतला असता तर वेबस्टरला पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले असते. यावेळी वेबस्टर फक्त ८ धावांवर होता, त्याने ७२ धावांची खेळी खेळली.

# भारताचे मुख्य प्रशिक्षक गंभीर इंग्लंडहून भारतात



**नवी दिल्ली, दि. १३ :**

भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर इंग्लंडहून भारतात परतले आहेत. एएनआय वृत्तसंस्थेनुसार, कौटुंबिक इमर्जन्सीमुळे गंभीर इंग्लंडहून भारतात परतला आहे.

भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. संघाला तिथे पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. गंभीर ६ जून रोजी उर्वरित संघासह इंग्लंडला रवाना झाला.

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामने खेळले जातील. पहिली कसोटी २० जूनपासून लीड्समध्ये सुरू होईल, तर शेवटची कसोटी ३१ जुलैपासून लंडनमधील ओव्हल येथे खेळली जाईल. २००७ पासून भारताने इंग्लंडमध्ये एकही कसोटी मालिका जिंकलेली नाही. अशा परिस्थितीत, संघ मालिका जिंकण्यावर लक्ष केंद्रित करेल.

कसोटी मालिका सुरू होण्यापूर्वी, वरिष्ठ संघ आजपासून बेकेनहॅम येथील केंट काउंटी क्रिकेट ग्राउंडवर चार दिवसांच्या आंतर–संघीय सामन्यात भारत अ संघाशी सामना करेल. हा सामना दुपारी ३ वाजता सुरू होईल. हा सामना इंग्लंड लायन्सविरुद्धच्या भारत अ संघाच्या दोन सामन्यांच्या अनऑफिशियल कसोटी मालिकेनंतर आहे. दोन्ही सामने अनिर्णित राहिले.

इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यांचा भारतीय संघ

शुभमन गिल (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, ऋषभ पंत (उपकर्णधार), ध्रुव जुरेल, नितीश रेड्डी, शार्दुल ठाकूर, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाशदीप, अर्शदीप सिंह, कृष्णा प्रदीप सिंह, कुलदीप यादव.

यावेळी भारत–इंग्लंड कसोटी मालिकेतील विजेत्या संघाला एक नवीन ट्रॉफी दिली जाईल, जी सचिन तेंडुलकर आणि जेम्स अँडरसन यांच्या नावावर असेल. दोन्ही दिग्गज खेळाडूंच्या सन्मानार्थ हा एक नवीन उपक्रम आहे. तेंडुलकर आणि अँडरसन दोघेही ११ जूनपासून सुरू होणाऱ्या थढउ फायनल दरम्यान लॉर्ड्स येथे ट्रॉफीचे अनावरण करतील. लंडनमधील लॉर्ड्स स्टेडियमवर दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना खेळला जात आहे. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिका १३८ धावा करून सर्वबाद झाली. ऑस्ट्रेलियाने त्यांच्या दुसऱ्या डावात ८ विकेट गमावून १४४ धावा केल्या. संघाने २१८ धावांची आघाडी घेतली.

# टी–२० फलंदाजीच्या रँकिंगमध्ये तिलक वर्माची मोठी झेप

**मुंबई, दि. १३ :**

बुधवारी आयसीसीने ताजी रँकिंग जाहीर केली. यात टी–२० फलंदाजीच्या रँकिंगमध्ये भारताचा दबदबा कायम राहिला आहे. टॉप ६मध्ये ३ भारतीय फलंदाजांचा समावेश आहे. तिलक वर्माने मोठी झेप घेतली आहे. तो आता तिसऱ्या स्थानावर आहे. गोलंदाजांबद्दल बोलायचे झाल्यास वरूण चक्रवर्ती तिसऱ्या आणि रवी बिश्नोई सातव्या स्थानावर कायम आहेत.

आयसीसी टी–२० फलंदाजांच्या रँकिंगमध्ये पहिल्या स्थानावर ट्रॅविस हेड आहे. त्याचे ८५६ रेटिंग पॉईंट्स आहेत. दुसऱ्या स्थानावर भारताला फलंदाज अभिषेक शर्मा आहे. त्याचे ८२९ पॉईंट्स आहेत. अभिषेक शर्माने या वर्षी इंग्लंडविरुद्ध ५ टी–२० सामने खेळलेत. यात एक शतक आणि एका अर्धशतकाचा समावेश आहे. त्याने आपल्या शेवटच्या टी–२०मध्ये इंग्लंडविरुद्ध ५४ बॉलमध्ये १३५ धावांची जबरदस्त खेळी केली.

तिलक वर्माने एका स्थानाने झेप घेतली आहे आणि आता तो तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. तिलकचे ८०४ रेटिंग पॉईंट्स आहेत. तिलक वर्माने यावर्षी ५ टी–२० सामने खेळले आहेत. यात त्याने इंग्लंडविरुद्ध एक अर्धशतकही ठोकले.

चौथ्या आणि पाचव्या स्थानावर इंग्लंडचा फलंदाज फिल साल्ट आणि जोस बटलर आहे. सहाव्या स्थानावर भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव आहे. त्याने ७३९ पॉईंट्स आहेत. टॉप १० बाबत बोलायचे झाल्यास भारताचे ३ फलंदाज आहेत याशिवाय इंग्लंडचे २ आणि श्रीलंकेचे २ खेळाडू आहेत.

सगळ्यात वरच्या स्थानावर वरूण चक्रवर्ती आहे. त्याचे ७०६ पॉईंट्स आहेत. गोलंदाजीच्या रँकिंगमध्ये अव्वल स्थानावर न्यूझीलंडचा जॅकब डफी आहे. त्याने ७२३ पॉईंट्स आहेत. यात टॉप १०मध्ये ३ भारतीय सामील आहेत. रवी बिश्नोई ६७४ पॉईंट्ससह दुसऱ्या आणि वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंह १०व्या स्थानावर आहे. आयसीसी टी–२० ऑलराऊंडर रँकिंगमध्ये हार्दिक पांड्या अव्वल स्थानावर आहे. त्याचे २५२ पॉईंट्स आहेत.

# चार दिवसीय सराव सामन्यातून जडेजा–कुलदीपमध्ये चुरस

**बेकेनहॅम, दि. १३ :**

भारताच्या वरिष्ठ कसोटी संघासाठी इंग्लंड दौऱ्यापूर्वीचा एकमेव सराव सामना शुक्रवारी बेकेनहॅम येथे खेळवला जाणार आहे. चार दिवसांच्या या इंट्रा–स्क्वॉड (आंतरसंघ) सराव सामन्यात डावखुरे फिरकीपटू रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव यांच्यात कसोटी संघातील स्थानासाठी थेट चुरस पाहायला मिळणार आहे. आगामी २० जूनपासून सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्ध हेडिंग्लेमधील पहिल्या कसोटीपूर्वी हा एकमेव सामना होणार आहे, ज्याचा उपयोग टेस्ट मॅचच्या सिम्युलेशनप्रमाणे केला जाणार आहे.

मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने युरोपियन फुटबॉल क्लबसच्या पद्धतीचा अवलंब करत या सामन्यासाठी 'बंद दरवाजांमागे' सराव सत्र ठेवले आहे, जेणेकरून कोणत्याही रणनीतीची माहिती प्रतिस्पर्ध्यांपर्यंत पोहोचू नये. याच पद्धतीचा वापर संघाने यावर्षीच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलिया दौऱ्यात केला होता.

भारतीय संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल यांनी याबाबत सांगितले की, दिवसाला ९० षटकांची पूर्ण क्षमता असलेल्या अशा सत्रात खेळाडूंना नेट सरावापेक्षा खूपच



जास्त वास्तवदर्शी अनुभव मिळतो. हा सामना अधिकृत प्रथम श्रेणी दर्जाचा नसला, तरी त्यात एखादा फलंदाज लवकर बाद झाल्यास त्याला दुसरी संधी दिली जाऊ शकते, ही जमेची बाजू संघ व्यवस्थापनासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

एकूण ३६० षटकांची मॅच सिम्युलेशन प्रणाली गोलंदाजांना हव्या त्या लयीत खेळवण्याची संधी देणार आहे. बुमराह, सिराज, आकाश दीप किंवा प्रसिद्ध कृष्णा यांसारख्या वेगवान गोलंदाजांबरोबरच फिरकी विभागातही गंभीरला महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागणार आहेत.

रवींद्र जडेजा हा संघाचा अनुभवी अष्टपैलू असून त्याच्या फलंदाजी क्षमतेमुळे तो संघात आपली जागा निश्चित मानला जातो. मात्र इंग्लंडच्या आक्रमक बेजबॉल' शैलीच्या फलंदाजांविरुद्ध कुलदीप यादवची विविधता आणि आक्रमकता ही जसप्रीत बुमराहसाठी पूरक ठरू शकते, असे काही संघातील निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळे या दोन डावखुऱ्या फिरकीपटूंमध्ये अंतिम अकरा निवडताना संघ व्यवस्थापनाला कठीण निर्णय घ्यावा लागेल.

या सराव सामन्यातून बुमराहच्या फिटनेसची मोठी चाचणी होणार आहे. सहा महिन्यांनंतर तो रेड–बॉल क्रिकेटमध्ये पुनरागमन करतो आहे. आयपीएलनंतर त्याने कोणताही कसोटी प्रकारातला सामना खेळलेला नाही. त्यामुळे विविध स्पेलमध्ये त्याला किती षटके गोलंदाजी करता येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघाला आकाश दीपचा फुल लेंथवर मारा प्रभावी ठरतो की प्रसिद्ध कृष्णाची बॅक ऑफ लेंथ गोलंदाजी अधिक परिणामकारक ठरते, हेही या सामन्यात पाहता येणार आहे.

हे सराव सत्र केवळ फलंदाज आणि गोलंदाजांसाठीच नाही, तर प्रशिक्षक, कर्णधार आणि निवड समितीसाठीही कसोटीची पूर्वतयारी ठरेल. कसोटी संघासाठी संभाव्य अंतिम अकरा निवडण्यात या सामन्यातील कामगिरी निर्णायक ठरू शकते.

# बाबर आझमची मोठ्या लीगमध्ये एंट्री!

**नवी दिल्ली, दि. १३ :**

पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम जगभर प्रसिद्ध आहे आणि टी–२० क्रिकेटमधील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक मानला जातो. आता तो पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या बिग बॅश लीगमध्ये खेळताना दिसणार आहे. त्याला बीबीएल संघ सिडनी सिक्सर्सने प्री–ड्राफ्टद्वारे करारबद्ध केले आहे. बाबर व्यतिरिक्त, पाकिस्तानचे वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी, हरिस रौफ, शादाब खान आणि यष्टीरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवान देखील यावेळी बीबीएलमध्ये सहभागी होतील.

बाबर आझमने बिग बॅश लीगमध्ये खेळल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि म्हटले की जगातील सर्वोत्तम टी–२० लीगपैकी एकामध्ये खेळणे आणि एका यशस्वी संघाचा भाग असणे ही माझ्यासाठी एक उत्तम संधी आहे. मला संघाच्या विजयात योगदान द्यायचे आहे आणि चाहत्यांशी संपर्क साधण्यास मी उत्सुक आहे. तसेच, हा अनुभव माझ्या कुटुंब आणि मित्रांसोबत शेअर करण्यास मी खूप उत्सुक आहे. बाबर आझम यापूर्वी कॅरिबियन प्रीमियर लीग, लंका प्रीमियर लीग आणि इंग्लंडच्या व्हिटॅलिटी ब्लास्ट सारख्या टी–२० स्पर्धांमध्ये खेळला आहे. त्याचा आंतरराष्ट्रीय अनुभव त्याला एक मजबूत खेळाडू बनवतो.

सिडनी सिक्सर्सच्या महाव्यवस्थापक राहेल हेन्स म्हणाल्या की, बाबर आझमचा क्रिकेट विक्रम हा एक मोठा पराक्रम आहे. त्याच्याकडे उत्तम अनुभव आणि कौशल्य आहे, जे आमच्या संघासाठी खूप फायदेशीर ठरेल. ही बातमी आमच्या चाहत्यांना खरोखरच उत्साहित करेल.

बाबर आझमने पाकिस्तान सुपर लीगमध्ये पाकिस्तान राष्ट्रीय संघ आणि पेशावर झल्मी संघाचे नेतृत्व केले आहे. त्याच्या टी–२० कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर, त्याने आतापर्यंत ३२० सामन्यांमध्ये ११,३३० धावा केल्या आहेत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २८२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 282 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .